# बिरसा मुंडा

## (दि. १५ नोव्हेंबर, १८७५ ते दि.०९ जून,१९००)

## (अल्प परिचय)

बिरसा मुंडा हे आदिवासी हक्क, स्त्री स्वातंत्र्य व मानवी प्रतिष्ठा यासाठी लढा देणारे पहिले आदिवासी नेता होते. बिरसा मुंडा यांचा जन्म झारखंडमधील उलिहातू या छोटयाशा खेडयात झाला. बिरसा मुंडा यांच्या शिक्षणासाठी त्यांचे मोठे भाऊ कानु यांनी त्यांना जर्मन ईसाई मिशन स्कूलमध्ये दाखल केले. शाळेमध्ये फादर नोट्रोट यांनी भाषणामध्ये मुंडा आदिवासी बद्दल अपशब्दांचा वापर केला, तेव्हा बिरसा यांनी त्यांना खडसावून प्रत्युत्तर दिले. त्यामुळे बिरसांना शाळेतून काढण्यात आले.

हिंदू, ख्रिश्चन व मुंडा आदिवासी या धर्मातील चांगली तत्वे एकत्रित करून नव्या बिरसाईट (Birsaites) धर्माची स्थापना करून त्यांनी लोक संघटन करून मुंडा जमातीत एकता निर्माण केली. त्यामुळे ते भगवान बिरसा म्हणून ओळखले जाऊ लागले.

सन १८५७ च्या क्रांती नंतर इंग्रजांनी छोटा नागपूर प्रदेशातील मुंडा आदिवासींच्या शेतजमीनी हिरावून घेतल्या होत्या. इंग्रजांच्या गुलामीत असलेल्या आदिवासी समाजाला मुक्त करण्यासाठी त्यांनी क्रांतिकारक चळवळीला सुरूवात केली. बिरसा यांनी इंग्रजांपेक्षा आपण बलाढ्य आहोत ही भावना समाजात निर्माण केली व नवचैतन्य निर्माण केले. बिरसांनी स्वराज्याची घोषणा करून इंग्रज शासनापुढे सशक्त आव्हान निर्माण केले. बिरसांनी पुकारलेल्या आंदोलनामुळे इंग्रजांनी त्यांना अटक केली. कैदेतून सुटल्यानंतर बिरसा मुंडा यांनी सेवादलाची स्थापना केली. गावोगावी गुप्त बैठका घेऊन मुंडा राज्य स्थापन करण्याच्या शपथा घेण्यात आल्या. या मुक्तीआंदोलनाला मुंडारी भाषेत “उलगुलान” असे म्हणतात. इंग्रजांनी कुटनितीचा वापर करून दि.३ फेब्रुवारी, १९०० रोजी बिरसांना अटक करण्यात आली. रांची येथे कैदेत असतांना इंग्रजांनी केलेल्या अतोनात छळामुळे त्यांचे निधन झाले. बिरसा यांच्या निधनानंतर इंग्रजांनी छोटा नागपूर टेनन्सी ॲक्ट मंजूर करून आदिवासींचे जमीनीवरील हक्क मान्य केले. रांची येथील डिस्टिलरी पुलाजवळ बिरसा यांची समाधी असून तेथे त्यांचा पुतळा उभारण्यात आला आहे. तसेच रांची येथील केंद्रीय कारागृहास आणि आंतरराष्ट्रीय विमानतळास बिरसा मुंडा यांचे नाव देण्यात आले आहे.

********

(स्त्रोत सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोष निर्मिती मंडळ)